RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# अध्यापक शिक्षण पदविका : नाविण्यपूर्ण उपक्रम

**विजय बाळासो कापसे**
क्रांतिस्मृती ज्यु.कॉलेज ऑफ एज्युकेशन,सातारा.
E-mail- kvijay94@rediffmail.com

**प्रस्तावनाः—**

Teaching is not a profession, which is joined by default but by choice.

विद्यार्थ्याची ही आवड विकसित होते ती प्रशिक्षण कालावधी.पदविका स्तरावरील प्रशिक्षणार्थी हा सामान्य स्तरातील व मानसिकदृष्टया गोंधळलेल्या अवस्थेत असतो. आणि त्याच्यावर परिसरातील वातावरणाचा अधिक प्रभाव पडतो. या पार्श्वभूमीवर अध्यापक विद्यालयात प्रशिक्षणार्थ्यास सुयोग्य आकार देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम योजावे लागतात. या उपक्रमांमुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या दैनंदिन अध्ययनात व सराव पाठकार्यामध्ये हे उपक्रम उपयुक्त ठरले. प्रस्तुत लेखातून अध्यापक विद्यालयात मी राबवलेल्या उपक्रमांची थोडक्यात माहिती

**उपक्रम**

१. Message of the day

परिपाठादरम्यान विद्यार्थ्यांनी करावयाच्या फलकलेखनावर विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा संदेश लिहिण्याची संधी देणे. हा संदेश प्रेरणादायी असावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना शशैक्षणिक कार्यास प्रेरणा मिळते.

२. **बाहुलीनाटय**

अध्यापनातील एकसुरीपणा दुर होण्यासाठी तसेच इतिहास विषयाचे विद्यार्थ्यांना प्रभावी आकलन होण्यासाठी इतिहासातील घटना व प्रसंगांची निवड करुन त्यातील पात्रानुसार पुठ्ठयाचे कटआउट तयार केले. एक पांढरा पडदा घेउन त्याच्या पाठीमागे २०० वॅटचा बल्ब लावून बल्ब समोर कटआउट ठेवल्याने त्याची सावली पडदयावर पडते व पडद्यासमोरील विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रित होते. त्यामुळे त्यांची प्रसंग पात्रे घटनाक्रम इत्यादीचे आकलन होते.

३. **नकाशे तयार करणे**

प्रशिक्षणार्थींची संख्या अधिक असल्याने व नकाशांची कमतरता दूर करण्यासाठी नकाशा तयार करण्याची दोन दिवसांची कार्यशाळा घेतली. पाठयपुस्तकातील नकाशांवर आधारित विद्यार्थ्यांनी कार्डशीटवर प्रमाणबद्ध नकाशे तयार केले. यातून त्यांचा कौशल्यात्मक विकास झाला शिवाय भविष्यामध्ये अशाप्रकारच्या अडचणी आपण दूर करु शकतो हा आत्मविश्वास ही प्राप्त झाला.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

४. **वर्ग ग्रंथालय**

अंशकालीन ग्रंथपाल प्रशिक्षणार्थींची वाचनाविषयी अनास्था यामुळे वर्गातच ग्रंथालय तयार केले. प्रशिक्षणार्थी अध्यापकाचार्य सराव पाठ श्शाळा यांच्या सहाकार्यातून शालेय पाठयपुस्तके मासिके संदर्भ पुस्तके दान स्वरुपात घेतली. वर्गातीलच एका प्रशिक्षणार्थ्याचे ग्रंथपाल म्हणून निवड केली. ग्रंथांची मांडणी देवघेव रजिस्टर विद्यार्थी क्रमांक ग्रंथपालाची कार्ये इत्यादीची माहिती दिली. यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना सरावपाठासाठी आवश्यक पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ उपलब्ध झाल्याने त्यांच्या सरावपाठाचा दर्जा सुधारला.

५. **प्रशिक्षणार्थी निरीक्षण नोंदवही**

अध्यापकाचार्यांचा तास संपल्यानंतर प्रशिक्षणार्थींनी निरीक्षण नोंदवहीमध्ये सर्वसाधारण ते उत्कृष्ठ यापैकी एक पद्निश्चयन करावे आणि वही इतर विद्यार्थ्यांना द्यावी. यामुळे अध्यापकांना आपल्या अध्यापनाचा दर्जा समजतो व योग्य सुधारणा करता येतात.

६. **सराव पाठ मार्गदर्शिका**

अध्यापक प्रशिक्षणार्थी यांच्या सहकार्यातून सराव पाठ मार्गदर्शिका तयार केली. यामध्ये एका इयत्तेसाठी पाच विद्यार्थ्यांचाÂएक गट करुन त्यांना त्याविषयातील पाठाचे तीस मिनिटानुसार भाग पाडणे त्यापाठाची उद्दिष्टये उदाहरणे अध्ययन अनुभव शैक्षणिक साधने मूल्यमापन यानुसार नोंदी केल्या सदर नोंदी अध्यापकांकडून तपासणी करुन मार्गदर्शिका तयार केली यामुळे कमी कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना सरावपाठाचे मार्गदर्शन करणे सुलभ झाले.

७. **विद्यार्थी संसद निवडणूक**

प्रशिक्षणार्थ्यांना राजकीय व निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी. याउद्देशाने अभिरुप पद्धतीने निवडणूक घेण्यात आली. यामध्ये निवडणूक आयोग उमेदवार उमेदवारी अर्ज आचारसंहिता चिन्हवाटप प्रचार क्रमदेय पद्धतीने प्रत्यक्ष निवडणूक आणि निकाल या सर्व टप्प्यांमुळे प्रशिक्षणार्थ्यांना सक्रिय नागरिकता योग्य उमेदवारांची निवड याची माहिती झाली.

अशाप्रकारे अध्यापक शिक्षण पदविका कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थी हा उत्साही व उमेदी असल्याने त्याच्या या गुणांचा उपयोग शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उपयोग करुन घेतल्यास प्राथमिक शिक्षणासाठी आवश्यक उपक्रमशील शिक्षक निर्माण करणे शक्य होईल.याचपद्धतीने विद्यार्थ्यांनी वर्षभर तयार केलेले टाकाउतून टिकावू वस्तू विविध प्रकारचे संग्रह शैक्षणिक साधने प्रकल्प इत्यादींचे प्रदर्शन भरविल्याने प्रशिक्षणार्थ्यांना प्रेरणा मिळते. ही प्रेरणा त्यांच्या भावी शैक्षणिक कार्यास निश्चित उपयोगी ठरते.